जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 DEC 2023
सकाळ

रसायनशास्त्रातील उत्कृष्ट कामगिरीचा सन्मान

# डॉ. जी. डी. यादव यांना 'सीएनआर राव' पुरस्कार

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २२ : रसायनशास्त्र आणि भौतिक विज्ञानातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. गणपती दादासाहेब तथा जी. डी. यादव यांची 'शास्त्र-सीएनआर राव' या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. या पुरस्काराचे वितरण २८ फेब्रुवारी रोजी तंजावर (तामिळनाडू) येथे होणार आहे.

या पुरस्कारासाठी कोणतेही नामांकन मागविण्यात आले नव्हते. डॉ. यादव यांच्या कामगिरीची दखल घेऊन प्रा. सीएनआर राव यांनी स्वतः त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली आहे. थिरुमलाईसमुद्रम येथील शास्त्र विद्यापीठाने रसायनशास्त्र आणि पदार्थ विज्ञान या दोन क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारताचे स्थान बळकट करण्यासाठी त्यांनी केलेल्या अतुलनीय सेवेचा गौरव करण्यासाठी भारतरत्न प्रा. सीएनआर राव यांच्या नावाने सन २०१३ मध्ये या पुरस्काराची सुरूवात केली आहे. पाच लाख रुपये आणि प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ. यादव यांचे मूळ गाव (अर्जुनवाडा, ता. राधानगरी) आहे. मुंबईतील रसायनशास्त्र तंत्रज्ञान संस्थेचे ते माजी कुलगुरू आहेत.



डॉ. यादव

"विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज शास्त्रज्ञ प्रा. सीएनआर राव यांच्या नावाने पुरस्कार जाहीर झाल्याचा खूप अभिमान वाटत आहे. या पुरस्काराच्या माध्यमातून माझ्या कार्याचा गौरव झाल्याचा आनंद आहे.
-डॉ. जी. डी. यादव

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 DEC 2023
तरुण भारत



कोल्हापूर : राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ॲड. धन्यकुमार गुंडे व निर्मला गुंडे यांचे स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. विजय ककडे, अनिल पाटील, डी. ए. पाटील, डॉ. चंद्रकांत चौगुले.

# ॲड. धन्यकुमार गुंडे यांची शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट

कोल्हापूर : राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ॲड. धन्यकुमार गुंडे कोल्हापूर दौऱ्यावर आले असता त्यांनी शिवाजी विद्यापीठास सपत्नीक सदिच्छा भेट दिली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी ॲड. धन्यकुमार गुंडे व निर्मला गुंडे यांचे शाल, स्मृतिचिन्ह व ग्रंथ भेट देऊन स्वागत केले. ॲड. गुंडे म्हणाले, मी शिवाजी विद्यापीठाचा माजी विद्यार्थी असल्याचा मला अभिमान आहे. त्याचप्रमाणे देशातील विद्यार्थ्यांमध्ये 'राष्ट्र प्रथम' ही सर्वोच्च भावना रुजविण्यासाठी सातत्याने प्रबोधन व कार्य करीत असून त्यासाठी पदाचा सदुपयोग करीत राहणार आहे. विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासनाच्या कार्याविषयीही त्यांनी कौतुकोद्गार काढले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी, विद्यापीठातील सामाजिक वंचितता व समावेशन धोरण केंद्र, लोकविकास केंद्र आदी केंद्रांच्या माध्यमातून अल्पसंख्याकांसह वंचित घटकांच्या उत्थानाच्या अनुषंगाने अभ्यास व संशोधन करण्यास विद्यापीठ प्राधान्य देत असल्याचे सांगितले. ॲड. गुंडे यांनी विद्यापीठातील प्रस्तावित भगवान महावीर अध्यासनाचे कार्य, संशोधन इमारत प्रकल्पाची माहिती घेतली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. विजय ककडे, महावीर अध्यासनाच्या सल्लागार समितीचे सदस्य अनिल पाटील, डी. ए. पाटील, डॉ. चंद्रकांत चौगुले आदी उपस्थित होते.